**FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED**
**(A Goverment of Maharashtra Enterprise)**

---

क्रमांक:प्रशा/आस्था-५/प्र.क्र.५३४(१)/२०२५-२६/329 नागपूर, दिनांक 25 APR 2025

**परिपत्रक**

**विषय :- एफडीसीएम लिमीटेड मधील अधिकारी / कर्मचारी तसेच परसेवेवरील अधिकारी कर्मचारी यांना एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडची गुप मेडीक्लेम पॉलीसी लागु करणेबाबत.**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्र. प्रशा/आस्था-५/प्र.क्र.५३४(१)/५०६६ दिनांक २८.०३.२०२५
२. या कार्यालयाचे पत्र क्र. प्रशा/आस्था-५/प्र.क्र.५३४(१)/१४ दिनांक ०२.०४.२०२५

एफडीसीएम लिमिटेड मधील अधिकारी, कर्मचारी तसेच परसेवेवरील अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी संदर्भीय पत्र क्रमांक १ अन्वये **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडची** ग्रुप मेडीक्लेम पॉलीसी **दिनांक २९.०३.२०२५ पासुन दिनांक २८.०३.२०२६ पर्यंत** लागु करण्यात आलेली आहे.

२.० त्याअनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये दिनांक ०४.०४.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता मेडिक्लेम ग्रुप पॉलीसी संदर्भात मार्गदर्शन व चर्चासत्र आयोजित करण्यात आलेले होते. सदरील मार्गदर्शनपर चर्चासत्रात श्री. संजीव गौड, व्यवस्थापकीय संचालक, डॉ.टि.ब्युला.एलिल मती, महाव्यवस्थापक (मुख्यालय), श्री. उत्तम सावंत महाव्यवस्थापक, नागपूर प्रदेश, श्री.आर.आर.बारटक्के, विभागीय व्यवस्थापक, नागपूर, सहाय्यक व्यवस्थापक श्री.ए.आर.घाटेकर, सहाय्यक व्यवस्थापक (आस्थापना), एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडचे श्री. सौरभ जैन, श्री. विकास देवरे, श्री. अभिजित पर्वते तसेच प्रोदशिक व्यवस्थापक, चंद्रपूर/नाशिक तसेच विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग (सर्व) इत्यादी अधिकाऱ्यांनी व्ही.सी. व्दारे उपस्थित राहून मेडिक्लेम ग्रुप पॉलीसीच्या संदर्भात अडचणी समस्याचे निराकरण करुन खालीलप्रमाणे बाबी उपस्थितांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत.

३.० **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडशी** संलग्नीत असलेल्या दवाखान्यात जाऊन तात्काळ कॅशलेस उपचार करुन घेता येईल त्यामुळे सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी ग्रुप मेडिक्लेम पॉलीसीअंतर्गत **कॅशलेश उपचारास प्राधान्य देण्यात यावे.** अपवादात्मक परिस्थितीमध्ये हॉस्पीटल मधील उपचारानंतर वैद्यकीय प्रतिपूर्ती करिता एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स पॉलीसीचे विहित प्रपत्रातील फॉर्म अ व फॉर्म ब भरुन देणे आवश्यक आहे. फॉर्म अ कर्मचारी तसेच फॉर्म ब हे हॉस्पीटल कडून परिपुर्ण माहिती तपशील आवश्यक दस्ताऐवजांसह भरुन एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स पॉलीसीचे कार्यालयास मंजूरीकरीता सादर करावे लागेल. (मेडिक्लेम पॉलीसीचे प्रपत्र अ व ब यासोबत संलग्नीत करण्यात येत आहे.)

४.० ग्रुप मेडिक्लेम पॉलीसीमध्ये मागील वर्षी समाविष्ट असलेले तसेच या वर्षी कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचारी यांना दिलेले मेडिक्लेम कार्ड यावर्षी सुध्दा कायम राहतील, तसेच या वर्षी नव्याने समाविष्ट झालेल्या पॉलीसी सदस्यांना नविन मेडिक्लेम कार्ड उपलब्ध करुन दिल्या जाईल. परंतू मागील वर्षीच्या मेडिक्लेम कार्ड वरील नमुद पॉलसी नंबर मध्ये बदल झाल्याने नविन सुधारित पॉलीसी नंबर उपचारादरम्यान संबंधीत हॉस्पीटलमध्ये दाखवावे लागेल. (नविन मेंबर डाटा व पॉलीसी नंबरची यादी संलग्नीत)

५.० ग्रुप मेडिक्लेम पॉलीसी अंतर्गत संलग्नीत हॉस्पीटलमधील कॅशलेश उपचाराकरिता Claim Approval साठी साधारणत: दोन तास लागतात. यासंदर्भात हॉस्पीटल मार्फत काही अडचणी येत असल्यास SBI ग्रुप मेडिक्लेम पॉलीसीचे Toll Free Number 1800-210-3366 या क्रमांकावर संपर्क साधावा.

६.० **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडशी** संलग्नीत असलेल्या दवाखान्यामध्ये पुर्वनियोजीत कॅशलेस उपचाराकरिता एक दिवसापुर्वी संबंधीत हॉस्पीटलमध्ये Pre Authorization Approval Submit करावी, जेणेकरुन हॉस्पीटल मध्ये रक्कम डिपोजीट करावी लागणार नाही तसेच हॉस्पीटलमधील उपचारानंतर कॅशलेश डिस्चार्ज त्वरीत होईल.

७.० वैद्यकीय प्रतिपूर्ती करिता हॉस्पीटलमधील डिस्चार्ज नंतर ३० दिवसापूर्वी **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स** कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांनतर वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रस्ताव मंजूरीकरीता विचारात घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

८.० एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स मेडिक्लेम पॉलीसी अंतर्गत वैद्यकीय प्रतिपूर्ती बिल मंजूरीकरीता सादर केल्यानंतर www.grouphealth.sbi.in या संकेतस्थळ वैद्यकीय बिलाची अद्यायावत स्थिती ऑनलाईन तपासणी करता येईल. वैद्यकीय प्रतिपुर्ती बिलामधील विविध त्रृटीमूळे मंजूरीकरीता बिलंब टाळण्याकरीता हॉस्पीटलधील उपचाराकरीता Hospital

**Admit Card, Discharge Card, Related Prescription, Pathology Reports, Bills, Final Hospital Bill, Adhar Card, Pan Card, Canceal Check of Employees, Medical Reimbursement Form Part A, Part B (Filled by Hospital)** इत्यादी आवश्यक दस्ताऐवज सादर करणे आवश्यक राहील.

८.० हॉस्पीटलमध्ये ॲडमिट होण्यापुर्वी उपचाराकरिता ३० दिवस तसेच हॉस्पीटल मधून डिस्चार्ज नंतर ६० दिवसापर्यंत उपचाराचे वैद्यकीय प्रतिपूर्ती मेडिक्लेम ग्रुप पॉलीसी अंतर्गत अनुज्ञेय असेल.

९.० सदरील ग्रुप मेडिक्लेम पॉलीसी अंतर्गत ओ.पी.डी. उपचार प्रतिपुर्ती लागू राहणार नाहीत. त्याअनुषंगाने **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स मेडिक्लेम पॉलीसीचे** एफडीसीएम सोबत झालेल्या अग्रीमेंट पॉलीसीचे दस्ताऐवज यासोबत संलग्नीत करण्यात येत आहे. सदरील करारामध्ये नमुद विविध आजारांचे उपचार अनुज्ञेय असेल, याची नोंद घ्यावी.

१०.० सदरील ग्रुप मेडिक्लेम पॉलीसी अंतर्गत सर्व अधिकारी/कर्मचारी यांची वार्षीक आरोग्य तपासणी मेडिक्लेम पॉलीसी करारानुसार अनुज्ञेय राहील.याची नोंद घ्यावी.

११.० कॅशलेस उपचारा तसेच वैद्यकीय प्रतिपूर्ती मदतीकरीता **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनीच्या** अधिकाऱ्याचे भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहे.

| **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडची ग्रुप मेडीक्लेम पॉलीसी** | | | |
|---|---|---|---|
| १ | ग्रुप मेडिक्लेम पॉलीसीचे संकेतस्थळ | www.sbigeneral.in | |
| २ | भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल | | |
| | **संपर्क अधिकाऱ्यांचे नांव** | **ई-मेल** | **भ्रमणध्वनी क्रमांक** |
| १. | श्री. विकास देवरे | vikas.deore@sbigeneral.in | 7507772857 |
| २. | श्री. सौरभ जैन | saurabh.jain@sbigeneral.in | 7066310988 |
| ३. | श्री. अभिजीत पर्वते | abhijit.parvate@sbigeneral.in | 9689896939 |

१२.० एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स अंतर्गत ग्रुप मेडिक्लेम पॉलीसीच्या संदर्भात प्रादेशिक स्तर / विभागीय स्तरावर नियुक्त संपर्क अधिकारी यांनी आपले स्तरावरील संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना मेडिक्लेम ग्रुप पॉलीसी संबंधीत मार्गदर्शन तसेच या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या निर्देशाचे पालन करुन संपुर्ण माहिती पोहचविण्याची कार्यवाही पार पाडावी.

सहपत्र - वरीलप्रमाणे (ई-मेल व्दारे)

***व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमीत***

**(यु.एस.सावंत)**
**महाव्यवस्थापक (मुख्यालय)**

प्रति,
महाव्यवस्थापक
एफडीसीएम लिमीटेड
नागपूर, प्रदेश नागपूर

प्रादेशिक व्यवस्थापक
एफडीसीएम लिमीटेड (सर्व)

प्रतिलीपी :- विभागीय व्यवस्थापक, एफडीसीएम लिमीटेड (सर्व) यांना सहपत्रासह माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

प्रतिलीपी :- एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेड यांना सहपत्रासह माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

प्रतिलीपी :- व्यवस्थापकीय संचालक कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी (सर्व) तसेच कक्ष प्रमुख (सर्व)

प्रतिलीपी :- सुचना फलक/ एफडीसीएम चे अधिकृत संकेतस्थळ www.fdcm.co.in